# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

क्र. सा.प्र./७०६ दिनांक : २ जानेवारी, २०१२

# जाहिरात शुद्धीपत्रक

## संदर्भ : क्र.साप्र/शे/१०/१२६४ दिनांक १८ सप्टेंबर, २०१०

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदानातून ११व्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रसंत तकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कार्यरत असलेल्या **महिला अध्ययन व विकास केन्द्रात दिनांक ३१ मार्च, २०१२** पर्यंत कंत्राटी स्वरूपात एकत्रित वेतनावर खालील पदे योजनेअंतर्गत भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात **दिनांक १३ जानेवारी, २०१२** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पद | पदसंख्या | एकत्रित वेतन प्रतिमाह |
|---|---|---|---|
| १. | **संशोधन सहायक** | ०१ | रू.८,०००/— |
| २. | **ग्रंथालय सहायक** | ०१ | रू.८,०००/— |

**शैक्षणिक अर्हता :**

**१. संशोधन सहायक :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. एस. डब्ल्यू. (Master of Social Work) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान द्वितोय श्रेणीत उत्तीर्ण असावा.
२) संशोधन प्रशासकीय कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा.
३) संगणकाची मान्यताप्राप्त परीक्षा उत्तीर्ण असावा.

**२. ग्रंथालय सहायक :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. लिब. (Master of Library Science) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असावा.
२) प्रशासकीय व ग्रंथालयीन कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा.
३) संगणकाची मान्यताप्राप्त परीक्षा उत्तीर्ण असावा.

**वयोमर्यादा :**

**वरील दोन्ही पदासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्ष व मागासवर्गियांसाठी ३८ वर्ष अशी राहील.**

विहीत नमुन्यातील आवेदन पत्र विद्यापीठाचे **सहायक कुलसचिव, सामान्य प्रशासन** हयांच्या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी (सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) **कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ** यांच्या नावाने रू. १००/— (रूपये शंभर) चा धनाकर्ष सादर केल्यानंतर प्राप्त होतील. ज्या उमेदवारांनी संदर्भांकित जाहिरातीनुसार यापूर्वी अर्ज सादर केले असतील त्यांनी नवीन अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. आवेदन पत्र सादर करण्याची अंतिम तारीख **दिनांक १३ जानेवारी, २०१२** असून या तारखेनंतर टपालाने किंवा प्रत्यक्षरीत्या प्राप्त झालेले अर्ज स्विकारल्या जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ. महेशकुमार येंकी)**
कुलसचिव